<u>प्रेसनोट</u>

दि.२४/०२/२०२०

## पोलीस हवालदारास लाच प्रकरणी शिक्षा.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | यवत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. १२/२०१३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, १३(१)(ड) सह १३(२) |
| शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव व कार्यालय | प्रकाश पोपट सोनार,तत्कालीन पोलीस हवालदार ब.नं. १४१६, तत्कालीन नेमणुक यवत पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,०००/- |
| थोडक्यात माहिती. | यातील तक्रारदार यांनी ऊसणे दिलेले पैसे वसुल करून देण्यासाठी आरोपी लोकसेवक प्रकाश पोपट सोनार, पोलीस हवालदार, (तत्कालीन) नेमणुक यवत पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण याने स्वीकारल्यावर त्याचेवर लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>सदरची सापळा कारवाई व तपास श्री. राजेंद्र विभांडीक, तत्कालीन पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. पुणे यांनी केला होता.<br>त्यानंतर श्री.ए.एस. भारती, तत्कालीन पोलीस उप अधीक्षक, यांनी विशेष न्यायालय, बारामती येथील न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते.<br>मा. श्री. डी.बी.बांगडे, विशेष न्यायाधीश, विशेष न्यायालय, बारामती यांनी आरोपी लोकसेवक प्रकाश सोनार यास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ मध्ये १ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा व १०००/- रूपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा, तसेच कलम १३(१)(ड) सह १३(२) मध्ये दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा व १०००/- रूपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आहे.<br>श्रीमती स्नेहल नाईक, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, विशेष न्यायालय, बारामती यांनी सरकार पक्षातर्फे खटल्याचे कामकाज पाहीले. |

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे युनिट.